# व्यक्तींची तस्करी ( प्रतिबंध, संरक्षण आणि पुनर्वसन) विधेयक २०१८ वर टिप्पणी

---

**लेखक**- खालील कार्यकर्ते, वकील आणि तज्ञांच्या सहभागामुळेच ही टिप्पणी आणि विश्लेषण करणं शक्य झालं आहे.

- आरती पै, वकील, संग्राम, बंगळूरू
- राकेश शुक्ला, वकील, सर्वोच्च न्यायालय.
- अरविंद नारायण, मानव अधिकार वकील, बंगळूरू
- स्वराज पॉल बरुआ, सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटी, बंगळूरू
- दर्शना मित्र, वकील, अल्टरनेट लॉ फोरम, बंगळूरू
- मीना सेषु, सामाजिक कार्यकर्त्या, संग्राम, सांगली
- मधु भूषण, SIEDS, बंगळूरू
- राजेश श्रीनिवास, सामाजिक कार्यकर्ते, संगमा, बंगळूरू

## 1. संविधानाला आव्हान

व्यक्तींची तस्करी विधेयक आणण्या मागचा विधिमंडळाचा हेतू ओळखण्याचा प्रयत्न केल्यास, भारतीय दंड विधानातील कलम ३७० आणि अनैतिक मानवी तस्करी (प्रतिबंध)कायदा १९५६ यासंबधी असलेले आक्षेप आणि तर्क यांचा परिप्रेक्ष्यातून पाहावे लागेल. सध्या अस्तित्वात असलेल्या तस्करीसंबंधी कायद्यांना पूरक तरतुदी करण्यासाठी हे विधेयक आणले आहे असे दिसते. परंतु सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्याला पूरक म्हणून हा कायदा आणला तरी संविधानातील मुलभूत हक्काच्या प्रकरणाच्या संदर्भात या कायद्याकडे पाहावे लागेल. भारतीय संविधानांतील मुलभूत हक्काच्या प्रकरणाची खालीलप्रमाणे ढोबळ विभागणी करता येईल.

- समतेचा अधिकार (कलम १४,१५,१६,१७,१८)
- स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९,२०,२१,२१- अ ,२२)
- अत्याचारा विरुद्ध अधिकार (कलम २३.२४)
- धर्म स्वातंत्र्याचा अधिकार ( कलम २५,२६,२७,२८)
- सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार (कलम २९ ,३०, ३१)
- संविधानात्मक उपायांचे अधिकार (कलम ३२,३३, ३४, ३५)

या कायद्यासाठी संविधानाच्या परिप्रेक्ष्यातून पाहिले तर व्यक्तींचे अत्याचारापासून संरक्षण देण्यासाठी हा कायदा केला असण्याची सर्वात जास्त शक्यता आहे. कलम २३ हे त्यासाठी समर्पक आहे ते असे:

भिकारी किंवा जबदस्तीने करवले जाणारे कोणत्याही श्रमासाठी होणारी व्यक्तीची तस्करीला मनाई असून या तरतुदीचे उल्लंघन करण्याच्या गुन्हयासाठी कायद्यानुसार शिक्षा होईल.

व्यक्तींचे सक्तीच्या रोजगारापासून संरक्षण करण्याचे कलम २३ चे उदात्त ध्येय पूर्ण करण्यासाठी हे विधेयक आणले असले तरी त्यासाठी संविधानाच्या अधिकाराचे उल्लंघन करता येणार नाही. या विधेयकाबाबत समस्या ही आहे

की कलम २३ ने दिलेले अधिकार पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असताना कलम २१ आणि १९ ने दिलेले मुलभूत हक्क संरक्षणाचे ते उल्लंघन करत आहे. कलम २१ हे भारतीय संविधानाचा आत्मा समजला जातो. काय आहे या कलमामध्ये:

काही कायदेनिहाय प्रक्रियेत असलेल्या व्यक्ती सोडल्यास इतर कोणाही व्यक्तीचा जगण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य हिरावून घेतले जाऊ नये.

जीवनाची संकल्पना आणि वैयक्तिक स्वातंत्र्य याविषयी सर्वोच्च न्यायालयाने विस्तृतपणे अन्वयार्थ लावला आहे. जीवनाचा अर्थ हा केवळ एखाद्या प्राण्याचे अस्तित्व एव्हढंच नसून त्यात सन्मानाने जगण्याच्या हक्काचाही समावेश आहे आणि जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यामध्ये गोपनियतेचा अधिकारही अभिप्रेत आहे.

कलम २१ मध्ये सन्मान आणि स्वायत्तता यांना विशेष महत्व आहे आणि तस्करी विधेयकात भा द वी कलम ३७० वरून तस्करीची व्याख्या करण्यात आली आहे त्यानुसार तस्करीला बळी पडलेली व्यक्ती संमती देऊ शकत नाहीत असे म्हंटले आहे म्हणजे तथाकथित बळीची स्वायत्तता नाकारली जात आहे.

ज्यांची तस्करी झाली आहे त्यांनाही आपल्या जीवनाविषयी निर्णय घेण्याचा अधिकार आहे. तस्करी झालेल्या व्यक्तिला त्यांच्या संमतीशिवाय संस्थेच्या ताब्यात ठेवण्याचे अधिकार अधिकाऱ्यांना देऊन हे विधेयक भारतीय संविधानाने व्यक्तीला निर्णय स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेचा दिलेला अधिकार हिरावून घेत आहे.

तथाकथित तस्करीच्या बळींची अशी स्वायत्तता काढून घेऊन आणि त्यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नाकारून त्यांचा सन्मान हिरावून घेतला जात आहे. आपल्या जीवनाबद्दल निर्णय अधिकार सर्व व्यक्तींना आहे हा अधिकार म्हणजेच व्यक्तींचा सन्मान करणे यामध्ये तस्करीला बळी पडलेल्या व्यक्तींचाही समावेश आहे.

अत्यंत कठीण परिस्थितीत असलेल्या व्यक्तीलाही स्वायत्तता आणि सन्मानाचा इतरांप्रमाणे अधिकार आहे.

एका सज्ञान व्यक्तीला कलम १९(१)(ग)नुसार मिळालेला अधिकार काढून केलेल्या अन्यायामुळे समानतेच्या मुल्यालाही बाधा येते. केवळ सेक्स वर्क करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत या व्यवसायात असलेल्या सज्ञान व्यक्तींना संरक्षण देण्याची आवश्यक्यता आहे असे शासन सांगते. कारण सेक्स वर्क आणि नैतिकतेशी खूप जवळचा संबंध आहे.

बहुसंख्य लोकांच्या नैतिकतेची अंमलबजावणी करणं हे सरकारसाठी महत्वाचं नाही. संविधानाच्या परिघात आपली धोरणं आखणे हे खरं तर सरकारचं काम आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना संविधानात्मक नैतिकता म्हणजे संविधानाने दिलेल्या अधिकारवर अतिक्रमण न करणारी नैतिकता अभिप्रेत होती. शेवटी सर्वात महत्वाचं म्हणजे या विधेयकाने सेक्स वर्कर्सला त्यांचा व्यवसाय निवडण्याचं स्वातंत्र्य नाकारलं जात आहे. हा अधिकार हिरावून त्याच्या जगण्याच्या हक्कावरच गदा आणली जातेय. सर्वांसाठी समान संधी निर्माण करण्यात सरकार अपयशी ठरले आहे आणि आता आधीच अनिश्चित आयुष्य जगणाऱ्या व्यक्तींचं जीवन अधिक कठीण आणि अव्यवहार्य केलं जात आहे. असं करून सरकार भारतीय समाजातला विरोधाभास आणि श्रीमंत आणि गरीब यांच्यात असलेली दरी वाढवत आहेत.


## 2. गुन्हेगारीकरण पण कल्याण नाही?

या विधेयकात संस्था आणि यंत्रणा यांनी छापे घालणे आणि पुनर्वसनासाठी ताब्यात घेणे आणि जामिनासाठी असलेल्या जाचक तरतुदी यामुळे गुन्हेगारीकरणाचा हेतू अधिक स्पष्ट होतो. कलम ५२ नुसार सर्व आरोपींना अटकपूर्व जामीन नाकारला जाईल आणि त्यांना दोन वर्षाहून अधिक शिक्षा भोगावी लागेल. कलम ४३८ नुसार न्यायालयाकडे अटकपूर्व जामीन मागण्याचा हक्क नाकारतो. हे कलम अतिशय हानिकारक असून खोट्या खटल्यांमध्ये बळींना कैद करण्यासाठी याचा गैरवापर होण्याची दाट शक्यता आहे. इटपा कायद्यांतर्गत सेक्स वर्क करणाऱ्या महिलांवर मालकीण किंवा दलाल म्हणून खटले केले जातात हा अनुभव आहे. अटक झालेल्या व्यक्तींना अटकपूर्व जामीन नाकारून या विधेयकाने गैरवापरला प्रतिबंध ही तरतूदच काढून टाकली आहे. बँक खाती आणि मालमत्ता गोठवणे, तस्करीसाठी वापरल्या गेलेल्या जागा सीलबंद करणे यासारख्या तरतुदी जगण्यासाठी अनिश्चित व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींकडे गुन्हेगारी कायद्याच्या दृष्टकोनातून पहात आहेत असं दिसतं. भीक मागण्यासाठी केलेली तस्करी ही गंभीर तस्करी समजली जाणार यावरूनही हा गुन्हेगारी दृष्टीकोन अधिक स्पष्ट होतो. या खटल्यातील बळींना आधारगृहात पाठवण्यात येणार आहे यावरून या विधेयाकामागे सरकारची विश्वासघाती मानसिकताच दिसून येते.

गुन्हेगार ठरवणारी तरतूद याबरोबर लैंगिक परिपक्वता येण्यासाठी वापरली जाणारे रासायनिक पदार्थ आणि हार्मोन्सचा वापर हेही गुन्हे ठरवल्याने परिणामी तृतीयपंथियांचा व्यवसाय आणि त्यांचे प्रेमसंबंध हा गुन्हा ठरेल. हार्मोन्सचा वापर गुन्हा ठरवल्याने हे विधेयक व्यक्तींचे अपहरण करून आणि हार्मोन्सचा वापर करून तृतीयपंथी त्यांची लैंगिक ओळख बदलतात हा गैरसमज दृढ करतात. जबरदस्तीने केलेले कोणतेही कृत्य शिक्षेस पात्र ठरावे परंतु या तरतुदीमुळे सहमतीने होणाऱ्या हार्मोन्सच्या वापराविरुद्ध या तरतुदीचा वापर केला जाईल आणि तृतीयपंथियांना लैंगिक ओळख आणि लैंगिक अभिव्यक्तीचा अधिकार नाकारला जाईल.

## 3. छापा, सुटका आणि पुनर्वसन

प्रस्तावित विधेयकात तस्करीतून सुटका केलेल्या बळींसाठी पुनर्वसन सुचवले आहे.




*चित्र १ - प्रस्तावित विधेयकात सुटका करण्याची पद्धत कायम ठेवली आहे.*

छापा/सुटका न्यायाधीशापुढे हजर करणे (सज्ञान व्यक्ती)-→ बळींना ठरविक काळ आधारगृहात ठेवण्यात येईल संरक्षण गृहाचे प्रभारी यांनी बनवलेल्या
तस्कारीविरोधी पोलीस अधिकारी --→ बाल कल्याण समिती --→ सज्ञान व्यक्तींचे मुक्त करण्याचा अर्ज फेटाळला जाऊ शकतो--→ पुनर्वसन आराखड्यानुसार दीर्घ पल्ल्याचे.
पुनर्वसन नियोजन केले जाईल.
देशाच्या सीमेपलीकडे प्रत्यार्पण
मूळ राज्यात प्रत्यार्पण

कलम १६ नुसार तस्करी विरोधी पोलीस अधिकारी आणि तस्कारीविरोधी कक्ष यांना “जीवाला आणि अत्यंत धोका’ असलेल्या व्यक्तीला कोणत्याही ठिकाणाहून, इमारतीतून बाहेर काढून न्यायाधीशांसमोर किंवा बाल कल्याण समितीसमोर हजर करण्याचे अधिकार दिले आहेत.

सज्ञान व्यक्तीची तस्करीविरोधी कक्षाने सुटका केल्यानंतर न्यायाधीश कलम १७ नुसार त्या व्यक्तीला संरक्षण गृहात पाठवण्याचे आदेश देऊ शकतात. सज्ञान व्यक्तीने मुक्ततेसाठी अर्ज केला तरी ही मागणी त्यांनी स्वेच्छेने केलेली नाही असे वाटल्यास न्यायाधीश हा अर्ज फेटाळू शकतात.

तस्करीला बळी पडलेल्या सज्ञान व्यक्तींच्या इच्छेला कमी लेखले आहे

सज्ञान व्यक्तींकडून त्यांचं जीवन, निवास आणि भविष्यावर परिणाम करणाऱ्या प्रक्रियांमध्ये सहभागी होण्यासाठी संमतीचा अभाव हे त्या व्यक्तीच्या निवड आणि संचार स्वातंत्र्याचे जतन आणि संवर्धन करण्याच्या सरकारच्या जबाबदारीवर घाला घालणारे आहे.

i. *<u>कलम १७ ची तरतूद</u>*

असे सांगते, बळी किंवा सुटका केलेली कोणतीही व्यक्ती जर बालक नसेल आणि त्याने स्वत:हून न्यायाधीशांना आपल्याला मुक्त करावे असा अर्ज प्रतिज्ञापत्रासह सादर केला आणि हा अर्ज त्याने स्वेच्छेने केला नाही असं न्यायाधीशांचं मत झालं तर लिखित कारणं देऊन न्यायाधीश हा अर्ज नाकारू शकतात.

प्रत्येक नागरिकाला त्याच्या जीवनाविषयी निर्णय घेण्याचा निवडीचा अधिकार संविधानाने दिला आहे. समोर हजर असलेल्या व्यक्तीची सुटका, पुनर्वसन आणि खटला चालवण्यासाठी इच्छा आणि संमती कायद्याने विचारात घेतली पाहिजे. व्यवसायात प्रवेश करतेवेळी व्यक्तीची तस्करी झालेली असली तरी वर्तमानात त्या व्यक्तींची संमती आणि इच्छा निश्चित करून घेतली पाहिजे.

प्रस्तावित विधेयकाच्या मसुद्यात 'बळी' ठरवलेल्या व्यक्तींची मर्जी नाकारली गेली आहे आणि प्रतिबंध, सुटका किंवा पुनर्वसन संदर्भात त्यांची इच्छा समजून घेण्याची तरतूद केलेली नाही. सुटका झालेल्या व्यक्तींना उपलब्ध पर्यायांपैकी निवड करण्याची संधी दिलेली नाही.

अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंध कायद्यातील कलम १७नुसार सुटका केलेल्या व्यक्तींचा दरम्यानच्या काळातील ताबा याविषयी आहे. संरक्षणगृहात पाठवले जात असलेलेया व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिली जावी असे म्हंटले आहे. तसेच कलम १६ (१) नुसार त्या व्यक्तीला कुंटणखान्यामध्ये वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले ही मिळालेली माहिती खरी आहे की नाही याची न्यायाधीशांनी चौकशी केलीच पाहिजे परंतु प्रस्तावित विधेयकातील कलम १७ न्यायाधीशांनी असं करण्याची गरज आहे असं सांगत नाही. इटपाच्या कलम १७ ने महिलांना अनिश्चित काळापर्यंत संरक्षणगृहात ठेवण्याचा आदेश देण्याचा न्यायाधीशांना आणि पोलिसांना अतिरिक्त अधिकार दिल्याबद्दल खूप टीका करण्यात आली. तरीही या विधेयकातील कलम १७ न्यायाधीशांना त्याहून जास्त अधिकार दिले आहेत. संरक्षणगृहात पाठवण्याअगोदर बळी पडलेल्या व्यक्तीचं म्हणणं ऐकून घेण्याचं न्यायाधीशांवर बंधन नाही. याउलट प्रस्तावित विधेयकात बळी पडलेल्या सज्ञान व्यक्तीने त्यांना मुक्त करण्याचा अर्ज केला तरी तो स्वत:हून केलेला नाही या कारणाने ते नाकारू शकतात. न्यायाधीशांनी संरक्षण गृहात पाठवणी केल्याविरुद्ध बळींना अपील करण्याची तरतूद या विधेयकात नाही.

सुटका आणि पुनर्वसन यंत्रणेने महिलांना असहाय करणाऱ्या परिस्थितीचा विचार करावा अशी सूचना केलेली आहे. महिलांचे स्थलांतर सुरक्षित होईल अशी परिस्थिती आणि कायदे तयार करण्यावर भर देण्याऐवजी ही धोरणं

महिलांच्या मुक्त संचाराच्या हक्कापासून परावृत्त करण्यावर भर देत आहेत. हा कायदा फौजदारी गुन्हा न केलेल्या सज्ञान व्यक्तींची इच्छा नाकारण्याचा न्याययंत्रणेला अधिकार देऊन त्या व्यक्तींचे भविष्य नियंत्रण करण्याचा आणि ठरवण्याचा अतिरिक्त अधिकार न्याययंत्रणेला देत आहे. मानवी स्वातंत्र्य आणि व्यक्तीची मर्जी या गाभ्यालाच यामुळे धक्का पोहोचला आहे. अशा जाचक निर्णयाला आव्हान देऊन अपील करण्याचीही या विधेयकात तरतूद नाही. .

सक्तीच्या पुनर्वसनाच्या नावाने केलेले कायदे आणि धोरणं याचा आंधळ्या अंमलबजावणीचे परिणाम असहाय समुदायांना सोसावे लागतात हा नेहमीचा अनुभव आहे. संग्राम आणि व्हँप यांनी नुकताच 'रेड झाली हो' हा अभ्यास केला त्यात महाराष्ट्रात पोलिसांनी धरलेल्या २४३ महिलांपैकी १९३ या स्वेच्छेने सेक्स वर्क करणाऱ्या १८ वर्षाहून जास्त वयाच्या महिला होत्या. त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध आधारगृहात डांबण्यात आलं होतं. त्यापैकी २८ महिलांना मुक्त करण्यापूर्वी ६ महिने ते ३ वर्षं आधारगृहात डांबून ठेवण्यात आलं होतं. प्रस्तावित कायद्यात ही प्रक्रिया सेक्स वर्कर्ससाठी आणखी क्रूर आणि कडक होणार आहे. गरिबी किंवा असुरक्षित काम करून उपजीविका ( सरोगेट महिला, घरकामगार, सेक्स वर्कर्स, तृतीयपंथी) करणाऱ्या असहाय समाजही याच्या कचाट्यात येणार आहे.

कोणत्याही व्यक्तीला विशेष/संरक्षण/ पुनर्वसन गृहात पाठवण्यापूर्वी तिची संमती महत्वाची असावी अशी आमची सूचना आहे. सुटका केलेली व्यक्तीला आधारगृहात असताना तिची इच्छा असेल तेव्हा संरक्षणगृहातून बाहेर पडता आलं पाहिजे. सुटका केलेल्या व्यक्तीला उपलब्ध कार्यक्रम आणि योजनांपैकी जे हवं त्याची निवड करण्याचं स्वातंत्र्य मिळालं पाहिजे.

### तस्करीला बळी पडलेल्या व्यक्तींना मर्यादित स्वातंत्र्य

या विधेयकातील कलम १७ न्यायाधीशांना बळींना आधारगृहात पाठवण्याचे अधिकार देते. उपकलम ४ नुसार बळी किंवा त्याच्या वतीने कोणी व्यक्ती प्रतिज्ञापत्र सोबत जोडून त्यांना मुक्त करण्यासाठी न्यायाधीशांना अर्ज करू शकते. परंतु त्याच तरतुदीमध्ये न्यायाधीशांना हा अर्ज स्वेच्छेने केला आहे असं वाटलं नाही तर ते हा अर्ज नाकारू शकतात. लक्षात घेण्यासारखी बाब ही आहे की या कलमामध्ये व्यक्तीला आधारगृहात पाठवण्यापूर्वी न्यायमूर्तीसाठी काहीही निकष ठरवलेले नाहीत. निष्पक्ष निकषांच्या अभावी कोणाला आधारगृहात पाठवायचे हे पूर्णपणे न्यायाधीशांचा निर्णय असेल. संस्थांमध्ये भरती करा असे म्हणणारे इतर कायदे उदा: बाल न्याय कायदाही संस्थेमध्ये व्यक्तीला ठेवणे हा शेवटचा उपाय मानतात. कुटुंब आणि परिचयाचा परिसर याचे महत्व जे जे कायद्याने वारंवार विषद केले आहे. परंतु या विधेयकात तस्करी झालेल्या व्यक्तीला कुटुंबीय असू शकतात असा साधा उल्लेखही करत नाही. तसेच बळींवर आर्थिक आणि इतर जबाबदाऱ्या असू शकतात याबद्दलही काही उल्लेख करत नाही. उदा : छापे घालून सुटका केलेल्या महिलांना त्यांच्या कुटुंबीयांपासून अगदी अल्पवयीन मुलांपासून महिनोंमहिने वेगळं केलं जातं असा आमचा अनुभव आहे. आपल्या कुटुंबीयासोबत राहण्याचा बळींचा हक्क याबद्दल विधेयकात काहीच उल्लेख नाही.

हे कलम पुनर्वसन करण्याकरता महिलांना संस्थेत राहण्याची सक्ती करू नये या बुद्धदेव कार्मास्कर विरुद्ध केंद्र सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरुद्ध आहे.

**ii.** पुनर्वसन

गरिबी, युद्ध, नागरी अशांतता, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, स्वस्त मजुरांची मागणी, कर्ज आदी तस्करीची मुख्य कारणं आहेत परंतु सध्याच्या विधेयकाचा दृष्टीकोन याच्या विपरीत आहे.

वेठबिगार कायद्यामध्ये वेठबिगारांना खालील विस्तृत संरक्षण दिलेले आहे.

प्रत्येक मजूर हा मुक्त असून बिगारी करण्याच्या कोणत्याही बंधनापासून त्याची सुटका करण्यात आली आहे.

- त्याला कर्जाची परतफेड करण्याच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात आलं आहे. त्याच्यावर कर्जाची परतफेड करण्यासाठी खटला चालवता येणार नाही. वेठ्बिगाराकडून जबरदस्तीने हिसकावून घेतलेली त्याची मालमत्ता परत केली जाईल.
- वेठ्बिगाराची मालमत्ता गहाणवट,शुल्क आकारणी, कराचा बोजा किंवा मालकीच्या दाव्यापासून मुक्त असेल.
- मुक्त केलेल्या वेठ्बिगाराला तो वेठबिगार म्हणून राहत असलेल्या त्याच्या घरातून बाहेर काढले जाणार नाही.

या विधेयकातील कलम ३१ (१) मध्ये वेठबिगारीसाठी तस्करीची व्याख्या केली आहे. कोणत्या संस्थेच्या ताब्यात देण्यापूर्वी बळींना न्यायाधीशांसमोर हजार केलं जाईल. २०१८ च्या वर्तमान विधेयकात वेठबिगारांना ताब्यात घेण्याचा दृष्टीकोन आहे, याउलट वेठबिगार कायदा कोठडीत डांबणारा नाही तर त्यांच्या अधिकाराचं संरक्षण करणारा आहे. १९७६ साली वेठ्बिगाराची मर्जी आणि अधिकार केंद्रस्थानी असलेला पुनर्वसनाचा दृष्टिकोनावर २०१८ सालचा कोठडीत डांबण्याचा दृष्टिकोन विशेषाधिकाराने लागू होणार. यावरून सध्याचे नव उदारमतवादी सरकार गरिबी आणि असुरक्षित मजुरी करणाऱ्या व्यक्तींना कशाप्रकारे हाताळणार हे या विधेयाकातून स्पष्ट होत आहे.

सध्याचे प्रस्तावित विधेयक बळींची सुटका करून त्यांना आधारगृहात ठेवणे आणि त्यांचे मूळ राज्यात किंवा देशात प्रत्यार्पण करणे याबद्दल स्पष्ट विधान करते. व्यक्तीच्या तस्करीला कारणीभूत ठरणारे घटक म्हणजे कर्जबाजारी होणे, जास्त व्याजदराने कर्ज घेणे, दु:खामुळे स्थलांतर करणे यावर मार्ग काढण्याचे प्रयत्न केले जात नाहीत. तस्करीला बळी पडलेल्या व्यक्तींची हतबलता वाढवणारा महत्वाचा घटक म्हणजे कर्ज ते मिटवण्याविषयी प्रस्तावित विधेयकात काहीही म्हंटलेले नाही.

सर्व तस्करी केलेल्या व्यक्तींसाठी एकच रामबाण उपाय लागू पडेल तो म्हणजे छापा, सुटका आणि पुनर्वसन यावर सरकारचा जोर कायम आहे त्याकडेच विधेयकही लक्ष वेधते. बळी व्यक्तीची मर्जी लक्षात न घेता कायदेशीर प्रक्रियेच्या मदतीशिवाय सेक्स वर्कर्सला सक्तीने डांबून ठेवण्यासाठी ही पद्धत वापरली जाते याचा आमच्याकडे भरभक्कम पुरावा आहे.

सेक्स वर्कर्सने आम्ही सज्ञान आहोत आणि स्वेच्छेने हा व्यवसाय करत आहोत असे सांगितले तरी त्यांना जबरदस्तीने पकडले जाते आणि त्यांच्या कुटुंबियांना त्या पुन्हा सेक्स वर्क करणार नाहीत असे लिहून देण्याची सक्ती केली जाते. अनेक प्रकरणात न्यायालयाने एच आय व्ही सह जगणाऱ्या सेक्स वर्कर्सला कुटुंबीय त्यांची देखभाल करण्यास सक्षम नाहीत असे सांगून त्यांना मुक्त करण्यास नकार दिला आहे. या रणनीतीमुळे सेक्स वर्कर्स भूमिगत होतात आणि हिंसा आणि अत्याचाराच्या परिस्थितीत सुरक्षेशिवाय काम करतात.

तस्करी विधेयक असमान प्रगती, विकासातील भेदभाव, असमानता याच्याशी संबंधित प्रश्नांकडे दुर्लक्ष करते आणि महिलांच्या संचारला गुन्हा ठरवून चांगल्या उपजीविकेच्या शोधात स्थलांतर करण्याच्या महिलांच्या आकांक्षेला खीळ

घालते. राजकीय, सामजिक आणि आर्थिक संकटात असलेल्या आणि आपत्तीग्रस्त महिला चांगल्या उपजीविकेसाठी स्थलांतर करतात. गरीबीमुळेही अनेक महिला मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. असमानतेचा मुकाबला करण्यासाठी गुन्हेगारीकरण, कैद, पुनर्वसन हेच सर्वोत्तम पर्याय आहेत का?

उदाहरणार्थ मानवी मैलावाहक बंदी आणि त्यांचे पुनर्वसन कायदा २०१३ च्या कलम १३ मध्ये व्यवस्थेतील असमानतेचा संवेदनशीलतेने विचार करून सर्वंकष पुनर्वसन यंत्रणा घालून दिली आहे.

बुद्धदेव कार्मास्कर विरुद्ध केंद्र सरकार या खटल्यामध्ये बळींच्या इच्छेविरुद्ध आधारगृहात डांबून ठेवणे निष्फळ आहे हे वारंवार सांगितले आहे. याच खटल्यात सर्वोच्च दिलेला सेक्स वर्क पॅनेल सातव्या अहवालामध्ये सेक्स वर्करच्या मुलांसाठी दिवस आणि रात्री पाळणाघर सुरु करावे असे म्हंटले आहे परंतु अशी काही तरतूद या विधेयकात केलेली नाही

संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यक्तींची तस्करी अहवालात घरबांधणी, तर मानवी मैलावाहक कायद्यात घर बांधणीसाठी जमिनीची तरतूद केली आहे. कर्नाटक सरकारने नुकतेच सेक्स वर्कर महिलांसाठी घरबांधणीचा प्रस्ताव सुचवला आहे. केवळ व्यक्तींना तस्करी केलेल्या जागेवरून हलवल्याने त्यांचं पुनर्वसन होण्यास मदत होणार नाही हे या शिफारशीमुळे स्पष्ट होतं. घरबांधणीच्या तरतुदीमुळे केवळ निवारा मिळतो असं नाही तर पुनर्वसन प्रक्रिया कायम चालू राहते.

महिलांची तस्करी होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या सामजिक घटकांचा विचारात घेऊन पुनर्वसनाचे उपाय तयार केले जावेत. मानवी मैलावाहक कायद्यांतर्गत पुनर्वसन प्रक्रियेत या प्रथेला बळी पडलेल्या व्यक्तींच्या उत्पन्नात खंड पडू शकतो याचा विचार केला गेला आहे तसेच या कुटुंबाना त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारातून काही तरी आधार मिळत असेल हे मान्य केले आहे ही समज या विधेयकात अजिबात दिसत नाही.

**iii.** <u>वैद्यकीय तपासणी</u>

कलम १६ (१) जिथे एक पोलीस अधिकारी किंवा तस्करी विरोधी कक्ष यांना विश्वास ठेवण्यास कारण असेल ....ते त्या व्यक्तीला त्या कोणत्याही जागेवरून अथवा इमारतीतून बाहेर काढून न्यायाधीशांसमोर हजार करू शकतात.... आणि त्यांचे वय ठरवणे, या प्रसंगामुळे त्यांना बसलेला मानसिक धक्का,इजा आणि आजार याचे मोजमाप करण्यासाठी वैद्यकीय तपासणी कारवाई यासाठी आवश्यक पावलं उचलावीत.

या तरतुदीमध्ये कुठेही सज्ञान व्यक्तीची संमती घ्यावी असे नमूद केलेले नाही. संविधानाच्या २१ व्या कलमामध्ये शारीरिक स्वायत्ततेचा अधिकारात कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय उपचार घेताना सज्ञान व्यक्तीची समती विचारात घ्यावी हा अधिकार गृहीत धरला आहे. अनेक प्रकरणांमध्ये सेक्स वर्कर्सची संमती न घेता वैद्यकीय तपासण्या करून त्याची माहिती न्यायालयाला पुरवली जाते. एच आय व्ही/ एड्स चाचणीच्या अहवालावरून या महिला स्वत:ची काळजी घेण्यास अक्षम आहेत या कारणाने त्यांना आधारगृहातून मुक्त करण्यास नकार दिला जातो.

## 4. जिल्हा तस्करीविरोधी समितीचे अधिकार

प्रस्तावित विधेयकात , प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा तस्करी विरोधी समिती स्थापन केली जाईल अनेक सराकारी विभाग, कायदा अंमलबजावणी, न्याययंत्रणा आणि सामजिक संस्थेचे प्रतिनिधी त्याचे सदस्य असतील. ही समिती

तस्करी झालेल्या व्यक्तीसाठी आधारगृहात वैयक्तिक देखभाल आराखडा तयार करेल आणि तसे निर्देश आधारगृहाला देईल. वेठबिगारांचे आंतरराज्यीय प्रत्यार्पण आणि सुटकेची प्रक्रिया आणि सुटका केलेल्या व्यक्तींना आधारगृहात पाठवण्यास मदत करतील.

*तस्करीला बळी पडलेल्या व्यक्तींना ओळखणे,त्यांची सुटका, संरक्षण, मदत, पुनर्वसन आणि प्रत्यार्पण बाबत समितीला निरंकुश अधिकार दिले आहेत. जिल्हा समिती सदस्यांना कोणताही गुन्हा न केलेल्या व्यक्तींबद्दल निर्णय घेण्याचे हे अधिकार दिले आहेत. बळीसोबत चर्चा न करणे , त्यांना निर्णयप्रक्रियेच्या केंद्रस्थानी न ठेवणे, त्यांचे निर्णय घेण्यासाठी त्यांच्या इच्छेचा मान न ठेवणे हे संशयास्पद आहे. सज्ञान व्यक्तीची सहमतीवर हा हल्ला असून संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्यावर असे बंधन घालणे धोकादायक आहे.*

*या कायद्यातील कलम १४ नुसार बळींची देखभाल, संरक्षण, उपचार, विकास आणि पुनर्वसन याबाबत निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार जिल्हा समितीला दिला आहे.*

जिल्हा समितीचा निर्णय अंतिम असेल आणि त्याला न्यायालयात आव्हान देता येणार नाही. कोणाही बळी पडलेल्या व्यक्तीला जिल्हा समितीने त्याची देखभाल, संरक्षण किवा प्रत्यार्पण याबाबत घेतलेला निर्णयाला आव्हान द्यायचे असेल तर न्याययंत्रणेत त्याला वाव नाही. त्याहूनही विशेष न्यायालयाला या समितीच्या शिफारशीं मान्य करणं बंधनकारक असणं हे जास्त आक्षेपार्ह आहे.

***२४. (३) बळी व्यक्ती अथवा त्यांच्यासारख्या व्यक्तीच्या पुनर्वसनाचा अंतिम निर्णय घेण्यापूर्वी न्यायाधीशांनी जिल्हा समितीबरोबर चर्चा करावी***

इटपा कायद्यातील तरतुदीनुसार न्यायाधीशांना बळीच्या पुनर्वसनाबद्दल निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी एक समिती नेमण्याचे अधिकार दिले आहेत. आताच्या विधेयकामध्ये न्यायालयाचे अधिकार जिल्हा समितिच्या शिफारशी मान्य करण्याच्या सक्तीमुळे आक्रसले आहेत. सध्याच्या या यंत्रणेमुळे जिल्हास्तरावर ही समिती न्यायालायाहून बलशाली होईल अशी भीती आहे आणि बळीला दाद मागण्याची संधी नाही. इतर तरतुदींच्या सोबत हे कलम पाहता पारदर्शकता, अपील आणि उत्तरदायित्व याचा अभाव असलेले अवाजवी अधिकार अनिष्ट आहेत.

पुढील कलमात नमूद केल्याप्रमाणे जिल्हा समितीला देशांतर्गत आणि देशाबाहेर प्रत्यार्पण करण्याचेही अधिकार दिले आहेत.

## 5. प्रत्यार्पण आणि अधिकार

*कलम २३ (१) जिल्हा तस्करी विरोधी समिती किंवा बाल कल्याण समिती यांच्यावर , प्रत्यार्पण प्रकरण असेल त्यानुसार, बळींच्या प्रत्यार्पणासाठी इतर जिल्ह्यातील समकक्ष सामित्यांबरोबर समन्वय करण्याची जबाबदारी असेल.*

*(३) राज्य नोडल अधिकाऱ्याने प्रत्यार्पणासाठी बळीकडून माहिती देऊन संमती घ्यावी. बळी राज्य नोडल अधिकाऱ्याला अशी संमती देऊ शकण्याच्या स्थितीत नसेल तर त्याने बळीचे प्रशिक्षित मनो सामजिक व्यावसायिकाकडे समुपदेशनासाठी पाठवण्याची व्यवस्था करावी.*

*(४) बळींची सुटका झाल्यानंतर जिल्हा तस्करी विरोधी समिती,किंवा बाल कल्याण समिती किंवा राज्य पोलीस नोडल अधिकारी यांनी ज्या प्रमाणे प्रकरण असेल त्याप्रमाणे तीन महिन्याच्या आत देशांतर्गत आणि सहा महिन्यात देशाबाहेरील प्रत्यार्पण पूर्ण करावे.*

चांगल्या उपजीविकेच्या शोधार्थ देशातील कोणत्याही प्रदेशात सुरक्षित संचार करण्याचे स्वातंत्र्य भारतीय नागरिकाला असताना प्रस्तावित कायदा बळींचे देशांतर्गत प्रत्यार्पण करायचे सुचवत आहे. ते अडचणीचे ठरू शकते.

समुपदेशन केल्यानंतर बळीला त्याच्या मूळ राज्यात परत पाठवावे असं प्रस्तावित तस्करी विधेयकात म्हंटलं आहे. व्यक्तीला काय समुपदेशन दिले जावे याबद्दल स्पष्टता नाही. मूळ राज्यात प्रत्यार्पण केल्यानंतर रोजगार देण्याच्या हमीबद्दल काही चर्चा केलेली नाही. तसेच प्रत्यार्पणाच्या आदेशाविरुद्ध अपील करता येईल किंवा विधी सल्ला मिळेल का? प्रत्यार्पणाला नकार देणाऱ्याच्या केसेस अधिकारी कसे हाताळणार आहेत, आधारगृहातून व्यक्तींना कधी आणि कसे मुक्त केले जाणार आहे? याबद्दल स्पष्ट उल्लेख नाही.

संविधानातील कलम १९ (१) (ड) देशातील सर्व नागरिकांना देशातल्या कोणत्याही प्रदेशात मुक्त संचार करण्याचा अधिकार देते. कलम १९ (१) (ई) देशातील सर्व नागरिकांना देशात कोणत्याही प्रदेशात राहणे आणि कायमचे वास्तव्य करण्याचा अधिकार देते. विधेयकातील कलम ३९ नुसार राज्य पोलीस नोडल अधिकारी बळीचे प्रत्यार्पण मूळ राज्यात करणार आहे. संबंधित व्यक्तीला इतर कोणत्या राज्याची वास्तव्यासाठी निवड करता येऊ शकते हे फक्त त्या व्यक्तीला निवड स्वातंत्र्य दिलं तरच होऊ शकेल. या कलमानुसार राज्य नोडल अधिकाऱ्याला पूर्ण माहिती देऊन संमती घ्यायची आहे. पण बळी व्यक्तीला पुन्हा मूळ राज्यात जाण्यची इच्छा नसेल तर त्यांना समुपदेशन द्यावे या व्यतिरिक्त काहीही प्रक्रिया सुचवलेली नाही. अशा व्यक्तीला आधारगृहात पाठवले जाणार का याबद्दल स्पष्ट काही म्हंटले नाही.

संबंधित व्यक्तीची संमती किंवा निवडीचे स्वातंत्र्य न देता परत पाठवण्याचे आदेश काढणे हे त्या व्यक्तीच्या मुलभूत अधिकारचं उल्लंघन आहे, असंविधानिक आहे आणि कायद्याच्या दृष्टीने चुकीचं आणि अनुचित आहे.

प्रत्येक भारतीय नागरिकाला देशातल्या कोणत्याही प्रदेशात मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. कोणालाही त्यांच्या मूळ जागी परत पाठवण्याची प्रक्रिया पूर्णपणे स्वेच्छेने आणि उपलब्ध पर्यायाची माहिती मिळाल्यानंतर निवड करून झाली पाहिजे. सुटका केलेल्या व्यक्तीला समुपदेशन दिले जावे आणि उपलब्ध पर्यायची माहिती आणि मूळ ठिकाणी परत जाण्याचे परिणामही समजावून सांगितले गेले पाहिजेत.

तस्करी झालेल्या व्यक्तीला समितीच्या अशा आदेशाविरुद्ध अपील करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे योग्य विधी सल्ला आणि विधी मदत मिळाली पाहिजे. तसेच त्यांना त्यांच्या अधिकाराबद्दल समुपदेशन मिळालं पाहिजे.

प्रत्यार्पण विरुद्ध पुनर्भेट

प्रत्यार्पण म्हणजे महिलांना त्यांच्या कुटुंबियांबरोबर पुन्हा भेट घडवणे नाही तर त्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी परत पाठवणे असं सुचवलं आहे. सध्यातरी महिलांना एका राज्यातील आधारगृहातून दुसर्या राज्यातल्या आधारगृहात हलवले जाईल असं दिसतंय. प्रत्यार्पण झाल्यानंतर प्रत्यक्ष कुटुंबीयांबरोबर पुन्हा भेट होण्यासाठी महिलांना दीर्घ आणि कठीण प्रक्रियेतून जावं लागेल. जे जे कायद्यामध्ये प्रत्यार्पण आणि पुनर्भेट यात फरक केला आहे.

पुनर्भेटीमध्ये मुलाला पुन्हा त्याच्या कुटुंबीयांबरोबर जोडणे अभिप्रेत आहे. प्रत्यार्पण म्हणजे पुन्हा त्याच सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थितीमध्ये परतणे. तसेही तस्करीचे बळी असलेल्या व्यक्तींच्या संदर्भात केवळ प्रत्यार्पण पुरेसे नाही. केवळ एका भौगोलिक क्षेत्रापासून बळीला वेगळे केले म्हणजे तस्करीचा प्रश्न सुटला इतके ते सोपे नाही.

## 6. अत्याचार - बाहेर काढणे

३४ *(l)* तस्करीसाठी वापरल्या गेलेल्या इमारतीचे व्यवस्थापन करणारे किंवा तशी कृती किंवा त्याला मदत करणारी कोणाही व्यक्तीला पाच वर्षे सश्रम कारावास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो. असा गुन्हा दुसऱ्या वेळेला किंवा त्याहून अधिक वेळा केलातर सश्रम कारावासाची शिक्षा सात वर्षापेक्षा कमी नसेल आणि दोन लाख रुपयांपर्यंत दंड भरावा लागेल.

(२) जो कोणी —

*(i)* भाडेकरू, रहिवासी, किंवा त्या इमारतीचे प्रभारी असेल, ती वापरत असेल किंवा जाणीपूर्वक इतर कुणाला ती इमारत अथवा तिचा काही भाग व्यक्तींच्या तस्करीसाठी वापरू देत असेल किंवा

*(ii)* मालक, भाडेकरू, किंवा मालकासाठी एजंटचे काम करणाऱ्या व्यक्तीने ती इमारत अथवा त्यातला काही भाग तस्करीचे बळी असलेल्या व्यक्तींवर अत्याचार करण्यासाठी किंवा स्वेच्छेने ती इमारत अथवा तिचा काही भाग व्यक्तींची तस्करी करण्यासाठी वापरला असेल

त्यांना पहिला गुन्हा शाबित झाल्यावर तीन वर्षांचा कारावास आणि एक लाख रुपयापर्यंत दंड आणि दुसऱ्या अथवा त्यानंतरच्या गुन्ह्याला पाच वर्षे सश्रम कारावास आणि दोन लाख रुपयांपर्यंत दंड आकारला जाईल.

खुलासा — उपकलम (२) च्या उद्देशाने कलम *(l)* किंवा *(ii)*मध्ये उल्लेख केलेली व्यक्तीने हे कृत्य केले नाही असे उलट सिद्ध होत नाही तोवर त्या व्यक्तीनेच तस्करी केलेल्या व्यक्तीवर अत्याचार करण्यासाठी इमारतीचा वापर करू दिला अथवा त्यासाठी इमारत किंवा काही भाग भाड्याने दिला किवा जसे प्रकरण असेल तसे ती इमारत अथवा काही भाग बळींवर अत्याचार करण्यासाठी वापरला गेल्याची त्यांना माहिती होती असं मानलं जाईल.

*संपूर्ण कलम* ३४ मध्ये तस्करीसाठी वापरलेली जागा आणि अत्याचारासाठी वापरलेली जागा या संज्ञा अदलाबदल करून वापरल्या आहेत. अत्याचार केलेली जागा कशी निश्चित केली जाईल? तस्करीसाठी केलेल्या तरतुदी सोबतच ती वाचली जाईल की ती एक स्वतंत्र तरतूद आहे, याचा अर्थ न्यायाधीशांनी लावायचा आहे. इटपा आणि कलम ३७० याचा तस्करी रोखण्यापेक्षा निवडक वेळी हेतुपूर्वक वेगवेगळा वापर केला जातो असा सेक्स वर्कर्स महिलांचा अनुभव आहे. न्यायाधीश आणि तस्करी विरोधी काम करणाऱ्या सामजिक संस्था अत्याचारचा सोयीस्कर अर्थ लावून सज्ञान सेक्स वर्कर्सना कैद करणे, त्यांना सुरक्षित काम करता यावं म्हणून घरं देणाऱ्या महिलांना अटक करण्यासाठी वापर करतात.

दुसरं म्हणजे प्रस्तावित विधेयकात ती जागा प्रत्यक्ष अत्याचार करण्यासाठी वापरली गेली नसेल पण तशी शक्यता असली तरी गुन्हेगार आणि रहिवासी यांना बाहेर काढावे असे म्हंटले आहे. या तरतुदीचा अर्थ फार व्यापक आहे

आणि त्याचा गैरवापर होण्याची दाट शक्यता आहे कारण ज्या इमारतीचा अत्याचारासाठी वापर होण्याची शक्यता आहे त्या इमारतीमधूनही लोकांना बाहेर काढणे आणि सील ठोकण्याचे अधिकार दिले जाणार आहेत.

ही तरतूद अत्याचार होण्याची शक्यता असलेली ठिकाणं म्हणून कारखाने, खाणी, दवाखाने, रुग्णालय, आणि खाजगी घरांसाठी पण लागू होणार आहे का हे पहावं लागेल.

*कलम ३५ (l) सध्या कायदा अस्तित्वात असूनसुद्धा पोलीस अथवा इतर सूत्रांकडून एखादी इमारत किंवा त्याचा काही भाग व्यक्तींच्या तस्करीसाठी वापरली जातो अशी माहिती न्यायाधीशांना मिळाली तर ही इमारत सात दिवसात का सील केली जाऊ नये यासाठी नोटीस जारी करू शकतील ...तसा आदेश जारी करतील*

*(i) त्या इमारतीतील कोणीही व्यक्ती किंवा राहिवासी यांना आदेश दिल्यानंतर सात दिवसाच्या आत बाहेर काढण्याचे निर्देश;*

*(ii) मालक, किंवा मालकाचा प्रतिनिधी यांनी इमारत अथवा त्याचा काही भाग भाड्याने देण्यापूर्वी..सुटका किंवा शोध घेत असताना तस्करीसाठी वापरली जात असेल तर न्यायाधीशांकडून पूर्व परवानगी घ्यावी लागेल असा निर्देश...*

अत्याचारासाठी वापरली गेलेली कोणत्याही जागेची व्यवस्था बघणे हा प्रस्तावित कायद्यानुसार गुन्हा आहे. अशा जागेची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तीला शिक्षा निश्चित केली आहे. परंतु ती जागा 'अत्याचारा'साठी वापरली गेली असल्यास गुन्हेगार आणि रहिवासी यांना इमारतीतून बाहेर काढले जाईल. कलम ३५ (१) (i) नुसार तस्करी आणि लैंगिक अत्याचारासाठी वापरलेल्या इमारतीतून रहिवाशांना सात दिवसात बाहेर काढण्याचे आदेश देण्याचे अधिकार न्यायाधीशांना दिले आहेत. ही तरतूद फारच अडचणीची आहे.

वेठबिगार कायद्याच्या कलम ८ च्या पूर्णपणे विपरीत अशी ही तरतूद आहे, या कलमात वेठबिगारीतून मुक्त केलेल्या व्यक्तीला आणि त्याचा कुटुंबियांना राहत्या ठिकाणाहून बाहेर काढण्यास मज्जाव केला आहे. कुंटण खाने ही बेकायदेशीर जागा असल्याने इटपा कायद्यांतर्गत सील केलेले कुंटणखाण्यातून ती तस्करी केलेली जागा असल्याने सेक्सवर्कर्स आणि त्याच्या कुटुंबीयांना बाहेर काढले जाते. त्याविरुद्ध अपील करण्यासाठी तरतूद नसल्याने त्या रस्त्यावर येतात असा अनुभव आहे.

या तरतुदींमुळे दोन समस्या निर्माण होतात.

- वेठबिगारांच्या बाबतीत या जागा म्हणजे काम करण्याचा जागा असतात उदा: कापड कारखाने, वीट भट्ट्या, कारखाने. तर व्यावसायिक सरोगसी करणाऱ्या महिलांसाठी अत्याचार होणाऱ्या जागा म्हणजे दवाखाने आणि रुग्णालये असू शकतात. प्रस्तावित विधेयकात ही ठिकाणे बंद करण्याचा विचार आहे का? ही ठिकाणे अत्याचारासाठी वापरली गेली असतील तर येथील सर्व कर्मचाऱ्यांना बाहेर काढणार का?

- इटपा कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीच्या इतिहासावरून हे स्पष्ट आहे की या तरतुदीचा उपयोग कुंटणखान्याना लक्ष्य करून सेक्स् वर्कर्सना त्यांच्या राहत्या घरातून बाहेर काढण्यासाठी केला जाईल. सेक्स वर्कर्सला गुन्हेगार म्हणून नाही तर रहिवासी म्हणून बाहेर काढलं जाईल. इटपाच्या कलम १८ वरून निघालेल्या या तरतुदीचा वापर इतिहासात अनेकदा कुंटणखाने सील करून सेक्स वर्कर्स आणि त्यांच्या मुलांना घराबाहेर काढलं

गेलं आहे. नुकतेच मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर इथे काही ठिकाणी सात दिवसांची नोटीस देऊन तर काही ठिकाणी नोटीस न देता कुंटणखाने बंद करण्यात आले आहेत. सज्ञान सेक्स वर्कर्स महिला त्यांची मुले आणि कुटुंबियांसह राहत असतील ती ठिकाणं बंद करण्यासाठी या तरतुदीचा वापर केला जाणार नाही हे स्पष्ट व्हायला हवं.

## ७. अभिव्यक्ती स्वातंत्र्य

***कलम ३६.*** *(l) एक व्यक्ती मानवी तस्करी करण्यास, स्वीकारण्यास,उत्तेजन देते जर ती व्यक्ती ...*

*(ii) व्यक्तीची तस्करी करण्याला अथवा तस्करी केलेलेया व्यक्तीवर अत्याचार करायला उत्तेजन देणारी जाहिरात, प्रसिद्धी, छापणे, प्रसारित करणे किवा कोणत्याही प्रकारे जाहिरात, प्रसिद्धी, छापणे, प्रसारित करणे यासाठी कारणीभूत ठरत असेल किवा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कोणतेही पुस्तिका, पत्रक, किंवा इतर प्रसारसाहित्य काढत असेल तर किंवा*

*या कलमामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याचं नियमन करण्याची भरपूर शक्यता आहे. "तस्करीला किंवा अत्याचाराला उत्तेजन' ही खूप व्यापक संज्ञा असून अनेक कृतीचा या कलमांतर्गत समावेश होऊ शकतो. प्रत्यक्ष आणि वास्तवात होणाऱ्या तस्करी विरोधात कडक धोरण घेण्याऐवजी कमजोर बाजूवर जास्त कठोर कारवाई केली जात आहे. ही तरतूद खूप संदिग्ध असून प्रौढांसाठी असलेल्या वेबसाईटच्या प्रकाशनाविरुद्ध कारवाई करण्यासाठी याचा गैरवापर होऊ शकतो. प्रौढांसाठी लिखाण करणारे लेखक, व्हिडियोग्राफर, सिनेनिर्माते आणि इंटरनेट साईट्स यांच्यावर तस्करी करण्यास किंवा अत्याचार करण्यास उत्तेजन देण्याचा आरोप केला जाईल.*

*कलम ३९ : व्यक्तीला खरेदी करणे आणि विकणे*

*(2) जो कोणी इलेक्ट्रोनिक माध्यमातून प्रसिद्धी करेल किंवा अश्लील फोटो/व्हिडियो काढेल अथवा वितरीत करेल किंवा पर्यटकांना रिझवण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी काही साहित्य प्रसारित करेल किंवा त्यासाठी एजंटचा वापर करेल किंवा इतर काही मार्गाने व्यक्तीची तस्करी करण्यास कारणीभूत ठरेल अशा व्यक्तीला किमान पाच वर्षांचा सश्रम कारावास जो १० वर्षापर्यंत वाढू शकेल आणि किमान ५० हजार दंड आकारला जाईल जो १ लाख रुपयापर्यंत वाढवला जाऊ शकतो.* .

कलम ३९ (२) तील व्याकरणाच्या कोलांटउड्या सोडल्या तर सोलीसिटिंग विरोधी तरतूद अत्यंत अडचणीची आहे. अत्यंत संदिग्ध व्याख्या असलेल्या कृतीसाठी ज्या कृतीचा प्रत्यक्ष व्यक्तीच्या तस्करीशी संबंध असण्याची शक्यता नाही त्याला कारवास निश्चित केला आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर तस्करीशी संबधित हेतू किंवा निष्पत्ती नसलेली कृती केवळ निष्पत्तीशी संबध असण्याची शक्यता असलेल्या कृतीसाठी कारावास मात्र निश्चित आहे.

प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कार्यकारणभावाकडेही दुर्लक्ष करून गुन्हा करण्याचा हेतू आणि पुरावा लागतो या फौजदारी कायद्याच्या किमान निकषांना आव्हान देणारी ही एक हुक्की आहे. एका वाईट मसुद्याला अतिरिक्त व्यापक वाव देऊन गैरवापर होण्यासाठी पूर्ण शक्यता ठेवली आहे. उदा : या तरतुदीमध्ये सध्या पुढील अर्थही सामावले जाऊ शकतात जो कोणी इलेक्ट्रोनिक माध्यमाचा वापर करून कोणत्याही प्रकारचे साहित्य, जे व्यक्तीची तस्करी करण्यासाठी कारणीभूत असेल त्या व्यक्तीला शिक्षा झालीच पाहिजे...' इलेक्ट्रोनिक माध्यमातून तस्कारीविषयी

केलेले शैक्षणिक संशोधनही या तरतुदीत बसू शकेल. तस्करीचे प्रमाण दर्शवणारा अभ्यासही व्यक्तीची तस्करी करण्यास कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे असं म्हणता येईल. खूप मोठ्या प्रमाणात होणाऱ्या तस्करीचे लाजिरवाणे आकडे दाखवणारा शैक्षिणिक अभ्यासालाही या तरतुदीचा धोका आहे याची कल्पना करता येते. तसेच आपल्याकडे मोठ्या संख्येने असलेल्या स्वयंघोषित नैतिक रक्षणकर्ते त्यांना न आवडलेली किंवा अश्लील वाटलेल्या कोणत्याही कलाकृतीला हे कलम लावू शकतील. कोणत्याही पुराव्याशिवाय सहजपणे काहीही व्यक्तींची तस्करी होण्याच्या 'शक्यतेशी' नेऊन जोडता येऊ शकते. याचे मुक्त अभिव्यक्तीवर विशेषत: तस्करीच्या मुद्द्यावर महत्वपूर्ण वक्तव्य करण्यावर तीव्र गंभीर परिणाम होऊ शकतात हे सांगायची गरज नाही.

*कलम ४१ - माध्यमांशी संबंधित गुन्हे*

*४१. (l) केवळ छापील नव्हे तर इंटरनेट, डीजीटल, किंवा इलेक्ट्रोनिक माध्यमाची मदत घेऊन जो कोणी व्यक्तीची तस्करी करेल त्याला किमान सात वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा भोगावी लागेल ती १० वर्षं इतकी वाढू शकते आणि किमान १ लाख रुपये दंड भरवा लागेल..*

*(2) जो कोणी कोणत्याही छापील अथवा इलेक्ट्रोनिक प्रकारचा वापर करून लैंगिक अत्याचार, लैंगिक हल्ला, किंवा बलात्कार याचा अत्याचार करण्यासाठी किंवा तस्करीला बळी पडलेली व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय यांच्यावर जबरदस्ती करण्यासाठी किंवा बेकायदेशीर फायद्याकरता वापरत असेल तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे. तीन वर्षं सश्रम कारावासाची शिक्षा पुढे सात वर्षापर्यंत वाढू शकते आणि किमान १ लाख रुपये दंड भरावा लागेल.*

या विधेयकाचा मसुदा तयार करणारे इलेक्ट्रोनिक आणि डिजिटल जग हे प्रत्यक्ष जगापेक्षा वेगळें आहे. त्यात माहिती हाताळण्यासाठी, अनेक कृतींसाठी, प्रसारण, साठा आणि प्रदर्शन करण्यासाठी तिसऱ्या मध्यस्ताची गरज लागते हे विसरले असावेत. या मध्यस्तांना आदान प्रदान होणाऱ्या प्रत्येक माहितीची कायदेशीर पडताळणी करणे शक्य नाही, उचित नाही आणि प्रत्यक्षात आणणे शक्य नाही. मध्यस्तांसाठी कायद्याने 'सुरक्षित ठिकाण' घोषित केली असून त्यांच्यातर्फे प्रसारित झालेल्या माहितीच्या जबाबदारीपासून त्यांना संरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे रचनात्मक आवश्यक कृती करणारे आणि मध्यस्थ यांना निश्चिंतपणे सहज काम करण्याची ग्वाही मिळते.

मध्यस्थांना संरक्षण दिले नाही आणि त्यांना ज्यावर देखरेख करणं अशक्य आहे एव्हड्या मोठ्या प्रमाणातील माहितीवर देखरेख करायला सांगण्याच्या धोकादायक स्थितीत ठेवलं तर नेहमीच टाळता न येण्याऱ्या चुकीसाठी त्यांना कायदेशीर कारवाईला तोंड द्यावं लागेल. याउपर ऑनलाईन अभिव्यक्तीमध्ये अनेक पातळीवर अनेक पहारेकरी आणि त्यांच्याशी संबधित अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि गोपनीयतेचे मुद्दे असतात. या तरतुदीचा हेतू सहानुभूतीने वाचला तर त्यात काम करण्याचे अभय आणि त्रयस्थ मध्यस्थांचा विचार झालेला दिसत नाही तसेच या विधेयकाचा मसुदा लिहिणाऱ्यांच्या माहिती अपलोड करणारे आणि ऑनलाईन माहितीचा प्रसार करणारे हे आणि प्रत्यक्ष माहिती प्रसारीत करणारे लोक एक नसतात ही साधी बाब लक्षात आलेली नाही हे समजतं.
ऑनलाईन माहितीचं वितरण, विक्री, आणि साठा यासाठी मध्यस्थांच्या मार्फत माहिती प्रसारित करावी लागते तसेच मध्यस्तांकडे तात्पुरती माहिती साठवावी लागते. भारतात माहितीचा प्रसार करणारे आणि तात्पुरती माहिती साठवणारे यांना कायद्याने संरक्षण दिले आहे. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० ( आय टी कायदा) तील ७९व्या कलमाने हे संरक्षण त्यांना मिळाले आहे. त्यामुळे जोवर ते

*(i)* केवळ वाहक आहेत आणि प्रसारण सुरु करत नाहीत, प्रसाराकाची निवड करतात,किंवा केवळ प्रसारित होणाऱ्या माहितीची निवड करतात किंवा त्यात बदल करतात

(ii) कायद्यांतर्गत त्यांची कर्तव्यं बजावताना आवश्यक काळजी घेतात आणि केंद्र सरकारच्या इतर मार्गदर्शक तत्वांचं पालन करतात.

माहिती तंत्रज्ञान ( मध्यस्थांसाठी मार्गदर्शक तत्वं) नियम २०११ मध्ये आयटी कायद्यातील ७९ कलमानुसार सुट मिळवायची असेल तर कारवाई लागणारी अटींच्या पूर्ततेची यादी दिली आहे. मध्यस्थांनी बेकायदेशीर कृत्य करण्यास प्रेरित केलं किंवा कट, मदत, अपराध केला तर त्यांना कायद्याचं अभय मिळणार नाही किंवा खरी माहिती मिळाल्यानंतर त्यांनी ती माहिती काढून टाकली नाही किंवा तिच्यापर्यंत पोहोचणे थांबवले नाही किंवा सरकारकडून नोटीस मिळाल्यानंतरही प्रसारित केलेली अथवा साठवलेली माहिती मध्यस्थांनी बेकायदेशीर कारणासाठी वापरली.

म्हणजे हे लक्षात येईल की आय टी कायद्याने मध्यस्थांची जबाबदारी अत्यंत खोलात जाऊन दिली आहे आणि विना अडथळा काम करण्यासाठी ७९ वे कलम दिले असून सध्या इतर कोणत्याही कायदा अस्तित्वात असेल तरीसुद्धा लागू होईल आणि कलम ८१ नुसात आय टी कायद्याचा परिणाम त्याउपर असेल असे पुन्हा ठळक केलेलं आहे. सध्या अस्तिवात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काही विसंगत असेल ( अपवाद स्वामित्व हक्क आणि पेटंट कायदा) तरीसुद्धा आय टी कायद्याच्या तरतुदी लागू होतील. या मुद्द्यासाठी ही कायद्याची चौकट योग्य आहे. असं असलं तरी तस्कारीविरोधी विधेयकाचा मसुदा करणाऱ्यांनी या पैलूचा अजिबात विचार केलेला नाही. त्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात त्यांनी आय टी कायद्याचा उल्लेख केलेला नाही आणि विधेयकात स्वत:चे वेगळे विना अडथळा ५९ कलम समाविष्ट केले आहे:

या कायद्यातील तरतुदी इतर अस्तित्वात असलेल्या कायद्याहून अधिक किंवा त्या कायद्याला कमी लेखणारी नाही. अशी काही विसंगती आढळल्यास या कायद्यातील तरतुदी या प्रभावी राहतील

याचा अर्थ आय टी कायद्यानुसार मध्यस्थांना मिळालेले कायद्याचे संरक्षण हे तस्करी विरोधी कायद्याला मान्य नाही आणि दोन्ही कायद्यात इतर विसंगत कायद्याहून हा कायदा प्रभावी आहे असं म्हंटल आहे. सर्वसाधारण कायद्यापेक्षा विशेष कायदाच प्रचलित मानला जाईल या तत्वाने हा कायद्याचा गोंधळ मिटवता येईल. हे दोन्ही कायदे तांत्रिकदृष्ट्या विशेष कायदे असल्याने हे आणखी अवघड होणार आहे. तस्करीविरोधी कायद्याचे लक्ष्य तस्करी आहे तर आय टी कायद्याचे लक्ष्य हा तंत्रज्ञान आणि कायदा आहे. तस्करी विरोधी विधेयकातील कलम ४१ (२) साठी आय टी हा विशेष कायदा ठरेल म्हणून आय टी कायद्याच्या ७९ कलमानुसार तस्करी विरोधी विधेयकातील कलम ४१ (२) हे अनावश्यक ठरवावे. या विश्लेषणावरून विधेयकातील कलम ४१ (२) मधील अनावश्यक आणि विवादित तरतुदी काढून टाकून विधेयकात सुधारणा करावी.

## 7. असहाय समुदायांचे गुन्हेगारीकरण आणि लांच्छन लावणे

**i.** भीक मागणारे

भीक मागणारे तृतीयपंथी आणि भिकारी या कायद्याच्या कक्षेत येतील. तस्करी सिद्ध करावी लागेल परंतु सेक्स वर्कर्सप्रमाणे भीक मागणाऱ्या तृतीयपंथीयांना तस्करीचे बळी म्हणून पुनर्वसन करण्यासाठी पकडलं जाईल.

**ii.** सेक्स वर्क

सुटका, पुनर्वसन, प्रत्यार्पण संदर्भातील विधेयकातील तरतुदीमधून स्वेच्छेने सेक्स वर्क करणाऱ्या महिलांना विधेयाकातून पूर्णपणे वगळले नाहीतर त्यांच्याविरुद्ध वापरल्या जातील. इटपा कायद्यातील कुंटणखाना चालवणे, सेक्स वर्क करून केलेल्या कमाईवर जगणे, सार्वजनिक ठिकाण ही कलमं जोवर रद्द केली जात नाहीत तोवर सेक्स वर्कर्स आणि त्यांना मदत करणाऱ्या व्यक्तीवर या कलमांतर्गत कारवाई होत राहील. कायद्याच्या हेतू समजून न घेता कायद्यातील तरतुदी स्वतंत्रपणे वापरल्या जातात असा सेक्स वर्कर्सचा अनुभव आहे. सध्याच्या इटपा च्या तरतुदीनुसार सेक्स वर्कर्स

- एकमेकींच्या आधाराने एकत्र राहत असतील तर त्यांच्यावर कुंटणखाना चालवण्याचा आरोप केला जातो. त्यांना बराच काळ जामीनही नाकारला जातो.
- सुरक्षित सेक्स वर्क करण्यासाठी मदत करणाऱ्या इतर त्रयस्थ व्यक्तींना अटक केलं जातं, कैद केलं जातं.
- सज्ञान सेक्स वर्कर्सने त्या स्वेच्छेने धंदा करतात त्यांची तस्करी झालेली नाही असं सांगितलं तरी त्याची आधारगृहातून मुक्तता केली जात नाही. १५ व्या अंतरिम अहवालात सर्वोच्च न्यायालयाने एकत्र राहणाऱ्या आणि एकमेकींच्या हितासाठी एकत्र काम करणाऱ्या सेक्स वर्कर महिलांना कायद्याच्या कक्षातून बाहेर ठेवावे असं सांगितलं आहे. असं असतानाही सेक्स वर्कर्सची जबरदस्तीने सुटका केली जाते आणि सुनावणी न करता त्यांना आधारगृहात डांबल जातं.

- उदाहराणार्थ व्हॅम्प, संग्राम यांनी केलेल्या एका अभ्यासात २४३ महिलांची तस्करी विरोधी सामाजिक संस्थांनी जबरदस्तीने सुटका केली होती त्यापैकी १९३ महिलानी सांगितलं की त्या सज्ञान होत्या आणि स्वेच्छेने सेक्स वर्क करत होत्या. असं असतानाही त्यांना अपील करण्याची संधी न देता त्यांना आधारगृहात डांबलं काहीना तर तीन वर्षांपर्यंत तिथेच ठेवलं जातं.

i. स्वेच्छेने सेक्स वर्क करणाऱ्या सज्ञान व्यक्ती आणि त्यांचे ग्राहक यांना प्रस्तावित विधेयकाच्या कक्षेतून बाहेर ठेवावे. प्रस्तावित बिलाच्या उद्देश आणि कारणे विषद करताना असा स्पष्ट उल्लेख करावा

ii. प्रस्तावित विधेयकात प्रतिबंध, सुटका आणि पुनर्वसनशी संबंधित व्याख्या करताना स्वेच्छेने सेक्स वर्क करणाऱ्या व्यक्तींना या तरतुदीच्या कक्षेतून वगळले जावे.

**iii.** स्वेच्छेने सेक्स वर्क करणाऱ्या सज्ञान व्यक्तींना आरोपी म्हणून पकडले जाऊ नये किंवा 'सुधारण्यासाठी' त्यांची सुटका केली जाऊ नये.

सेक्स वर्कर्सना विरोध नोंदवता न येणं

प्रस्तावित विधेयकात जिल्हा ते केंद्र स्तरापर्यंत सामित्यांसामोर आपलं म्हणणं मांडण्याची मुभा नाही. सेक्स वर्कर्सच्या अधिकारासाठी काम करण्याचा अनुभव असलेल्या संस्था आणि सेक्स वर्कर्सच्या संस्था यांचा जिल्हा राज्य तस्करी विरोधी समितीत अवश्य सहभाग असावा. सेक्स वर्कर्स महिलांसोबत काम करण्याचा अनुभव असलेले वकील, वंचित आणि हिंसाग्रस्त महिलांचाही या समितीत समावेश केला जावा. राज्य एड्स नियंत्रण संस्थेचा प्रतिनिधीही या समितीत असावा. राष्ट्रीय तस्करी विरोधी बोर्ड मध्ये सेक्स वर्कर्स नेटवर्क/ संस्था आणि महिला हक्कांसाठी त्यात सेक्स वर्कर्सच्या हक्कासाठी काम करण्याचा अनुभव असलेल्या कार्यकर्त्यांचा समावेश केला जावा. कायद्याने घालून दिलेल्या प्रक्रिया ठरवताना सेक्स वर्कर्सबरोबर विचार विमर्ष केला नाही की त्यांना प्रतिनिधित्व मिळाले नाही तसेच त्यांच्याकडून समुपदेशन आणि पाठिबा देण्याची संधी दिलेली नाही.

खटला चालवणे आणि न्याय यंत्रणेचे ट्रेंड - तस्करी झालेल्या व्यक्तींवर अत्याचार

सध्या सेक्स वर्कर्सच्या ग्राहकांवर खटला चालवण्याचा ट्रेंड आहे असं दिसतंय. इटपा अंतर्गत आरोप रद्द केल्यानंतर भा. द. वि कलम ३७० नुसार तस्करी केलेल्या व्यक्तीवर अत्याचाराचे खटला चालवावा असे न्यायालयाने सांगितलं आहे. खटला चालवण्याचे आणि न्याय यंत्रणेचे हे ट्रेंड सेक्स वर्कर्सच्या अनुभवातून पुढे आले आहेत. भा द वि ३७० अ नुसार तस्करी झालेल्या अल्पवयीन आणि सज्ञान व्यक्तीवर अत्याचार हा गुन्हा आहे. याचा अर्थ सेक्स वर्करच्या ग्राहकाला तिची तस्करी झाली आहे याची माहिती आहे असं गृहीत धरलं जाणार आणि त्याला अशी माहिती नसल्याचे सिद्ध करावे लागेल. कलम ३७० अ चा आधीच सज्ञान सेक्स वर्कर्सच्या ग्राहकांना 'तस्करीचे बळी' आणि 'सेक्स वर्कमधील सज्ञान महिला' असा फरक करण्याचे कष्ट न घेता अटक करण्यासाठी उपयोग करण्यात आला आहे. खरं तर, २०१६ मध्ये काही खटल्यात स्वत: पुढाकार घेऊन उच्च न्यायालयाने पोलिसांना सेक्स वर्कर्सच्या ग्राहकांना ३७० अ कलमांतर्गत अटक कण्याचे आदेश दिले आहेत

विधानमंडळाने सध्या चालू असलेले प्रघात विचारात घेतले पाहिजेत. विशेषत: कलम भा द वि३७० अ नुसार तस्करी केलेल्या व्यक्तीवर अत्याचार संदर्भात तयार केलेला गुन्हे.

**iii.** गर्भ वाढवणे

*[नैसर्गिक अथवा प्रजनन तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्भ वाढवण्यासाठी तस्करीचा गुन्हा करणारा कुणीही]* कलम ३१ *(ii).*

प्रस्तावित सरोगसी विधेयकामुळे सरोगेट होण्यासाठी सज्ञान महिलेने संमती देणे याला स्थानच नाही. या विधेयकात सरोगेट/सरोगसी या संज्ञा वापरली गेलेली नाही. सरोगसी विधेयक २०१६ ला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली आहे. त्याचाच टेम्प्लेट म्हणून वापरले आहे. परंतु सरोगसी विधेयक अजून संसदेत सादर झालेले नाही आणि व्यावसायिक सरोगसीवर बंदी आणण्याचे सावर्जनिक चर्चा आणि वाद अजून शमले नाही. सरोगसी विधेयक आणून व्यावसायिक सरोगसीवर ज्या पद्धतीने बंदी आणण्याचा प्रयत्न यावर व्यापक स्तरावर प्रश्न विचारले गेले पाहिजे.

याउपर, सर्व प्रकारची सरोगसी हा अत्याचार आणि तस्करी समान समजली गेली आहे. तसेच विधेयकात उल्लेख असलेल्या इतर श्रमाच्या पर्याय दिले आहेत त्यात कोणत्याही परिस्थितीत महिला सरोगेट होण्यासाठी कधीही संमती देऊ शकत नाही असे म्हंटले आहे हे जमिनी वास्तवाच्या विपरीत आहे.

**iv.** एच आय व्ही/ एड्स सह जगणाऱ्या लोकांना लांच्छन लावणे.

*[व्यक्तींची तस्करी करण्याचा गुन्हा करणारा कुणीही आणि तस्करीचा परिणाम म्हणून बळीला एच आय व्ही/एड्स किंवा इतर जीवघेण्या आजाराची लागण होण्याची शक्यता]* कलम ३१ *(viii)*

या कलमामध्ये सर्व व्यावसायिक धोके समजावून सांगितले पाहिजेत विशेषत्वाने केवळ एच आय व्हीचा उल्लेख करण्याची गरज नाही त्यामुळे कलंक वाढतो. ए आर टी औषधाच्या उपलब्धतेमुळे एच आय व्ही हा आता जीवघेणा आजार न राहता दीर्घ पल्ल्याचा आजार झाला आहे.

एच आय व्ही/एडस बाबत तीन महत्वाची तत्वं आहेत संमती (माहितीपूर्ण), समुपदेशन आणि गोपनीयता याचा विधेयकात उल्लेख केला पाहिजे. तस्करी केलेल्या व्यक्तींची कोणत्याही लागणीसाठी आजारासाठी चाचणी केली जाते विशेषत: लिंग सांसर्गिक आजार किंव एच आय व्ही / एड्स ची चाचणी होणार असेल तर त्या व्यक्तीला चाचणीपूर्व आणि चाचणीनंतर समुपदेशन दिले जावे आणि माहितीपूर्ण संमती घेणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीला चाचणी करायची नसेल तर तिच्या हक्काचं रक्षण केलं पाहिजे. तिच्या चाचणीचे निकाल गोपनीय ठेवले जावेत ते सार्वजनिक केले जाऊ नयेत.

### जामीन मिळण्याच्या अधिकाराचे उल्लंघन

कलम ५२ *(2)* फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये जे आहे तरीसुद्धा —

*(a)* या कायद्यांतर्गत गुन्हा केलेल्या कोणत्याही व्यक्तीला अटक करण्यासाठी संहितेमधील कलम ४३८ लावले जावे आणि दोन वर्षाहून जास्त कारवास व्हावा.

*(b)* या कायद्यांतर्गत गुन्हा केलेल्या व्यक्तीला जामिनावर किंवा त्याने स्वत: केलेल्या करारावर सोडलं जाऊ नये अपवाद —

> *(i)* अशा सुटकेच्या अर्जावर विशेष सरकारी वकिलांना विरोध करण्याची संधी दिली गेली असेल
>
> ***(ii)*** जिथे या अर्जाला विशेष सरकारी वकीलाने विरोध केल्यानंतर न्यायालाल्याला आरोपी दोषी नाही असे साधार पटले आणि जामिनावर असताना ती व्यक्ती पुन्हा हा गुन्हा करणार नाही अशी खात्री पटल्यास; गुन्ह्यासाठी दोषी ठरेपर्यंत स्वातंत्र्याचा अधिकार सीमित करण्याचा प्रयत्न करणारी ही दोन कलमं आहेत. प्रस्तावित विधेयकात पहिल्या कलमात गुन्ह्याच्या आरोपींना दोन वर्षाहून जास्त कारावास सांगितला आहे आणि अटकपूर्व जामीन पूर्णपणे नाकारला आहे. कोणीही व्यक्ती दोषी सिद्ध झाल्याशिवाय तिला कैद होऊ नये हाच अटकपूर्व जामीन देण्याचा मुख्य उद्देश आहे. या अगोदर सांगितल्याप्रमाणे ही तरतूद हानिकारक आहे आणि बळीच्याविरुद्ध केल्या जाणाऱ्या खोट्या खटल्यांमध्ये याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे.

आणि साध्या जामिनावर घातलेल्या अटींची दुसरी तरतूद कलम ५२ (२) (ब) ही तेव्हढीच अडचणीची आहे. न्यायालय कैद नव्हे जामीन हा मुलभूत नियम पाळतात. आरोपी निष्पाप आहे हे गृहितका फौजदारी न्याय तत्वाचा आदर्श आहे. गुन्हा शाबित होण्यसाठी खटला चालू असताना जेल मध्ये कैदेत ठेवणे हे जगण्याचा, स्वातंत्र्याचा हक्क आणि निष्पाप असण्याच्या गृहीताला बाधा आणतात. जी व्यक्ती पळून जाईल किंवा साक्षीदारांना धमकावेल किंवा इतर गुन्हे करेल अशी परिस्थिती असेल तर जामीन नाकारला पाहिजे. जामीनाच्या सर्वसाधारण कायद्याप्रमाणे जन्मठेप किंवा फाशीचे शिक्षा होण्यायोग्य गुन्ह्यांच्या बाबतीत सरकारी वकिलाला नोटीस पाठवावी . जामिनावर सोडण्यासारख्या महत्वपूर्ण मुद्द्यावर निर्णय घेण्यापूर्वी त्यांची बाजू ऐकावी लागता. सध्याचे उप कलम ५२ (२) (ब) (ii) नुसार जामीन देण्यापूर्वी आरोपी असा गुन्हा करण्याचा दोषी नसेल यावर विश्वास ठेवण्यासाठी वाजवी तथ्य आढळलं पाहिजे. म्हणजे सुनावणी न होता आणि व्यक्ती विरुद्ध गुन्हा शाबित होण्यापूर्वी कैद आणि स्वातंत्र्यावर मर्यादा आणणे आणि जामीन नाकारण्या सारखं आहे.

अंमली आणि मादक पदार्थ कायदा १९८७ मध्येही कलम ३७ (१) ही समान तरतूद आहे. आरोपी दोषी नाही अशी न्यायालयची खात्री पटल्याशिवाय त्याला जामीन दिला जाणार नाही. या तरतुदीनुसार जामिन नाकारला जातो

आणि वर्षानुवर्ष कैदेत राहावं लागतं असा या कायद्याशी संबधित काम करणाऱ्यांचा अनुभव आहे. अशीच क्रूर तरतूद दहशतवाद प्रतिबंध कायदा (पोटा) आणि दहशतवादी आणि विध्वंसक कृत्य (प्रतिबंध) या कायद्यातही अशी तरतूद आहे त्यामुळे खटला न चालता वर्षानुवर्ष व्यक्ती कैदेत असतात त्यावर मानवी अधिकार चळवळीने कडक टीका केली आहे.

इटपानुसार कुंटणखाण्याची मालकी असल्याच्या आरोपाखाली अटक केलेल्या सेक्स वर्कर्सना दीर्घ काळ तुरुंगात कैदेत ठेवलं जातं आणि साधा जामीन नाकारला जातो हा सेक्स वर्कर्सचा अनुभव आहे. जामीन मिळवण्यासाठी सेक्स वर्कर्स संघटनेचा पाठींबा असेल तरी या महिलांना ४-५ महिने कैदेत राहावं लागतं. ज्या महिलांना असा पाठींबा उपलब्ध नसतो त्या अनंतकाळ तुरुंगात खितपत पडतात त्यांच्यावर तस्करी करणे, महिलांना जबरदस्तीने सेक्स वर्क करायला लावणे किंवा त्यांच्या कमाईवर जगण्याचे आणखी आरोप लावले जातात. या तरतुदीचा गैरवापर होण्याची शक्यता खूप जास्त आहे.

## 8. चांगल्या हेतूने केलेल्या कृतीला संरक्षण (कलम. ५३)

सध्याची तरतूद केंद्र आणि राज्य सरकार आणि सरकारच्या निर्देशावरून काम करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण देते. अनेक छापे, सुटका आणि सक्तीच्या पुनर्वसन प्रक्रिया हे सामजिक संस्थांनी केलेल्या उपायामुळे अनेक सुटका केलेल्या व्यक्तींच्या हक्कांच उल्लंघन होतं. या छापे आणि सुटका प्रक्रियेत कोणतीही पारदर्शकता नाही की कोणाचं उत्तरदायित्व नसते. प्रत्यक्षात अनेक सामजिक संस्था व्यक्तींना तस्करीचे बळी दाखवून त्यांच्या संमतीविना दीर्घ काळासाठी डांबून ठेवतात आणि निधी मिळवतात. मुक्त होऊ पाहणाऱ्या सेक्स वर्कर्सना हिंसा आणि अमानवी वर्तणूक मिळाल्याचे अनुभव आहेत.

प्रस्तावित विधेयकाच्या सध्याच्या योजनेत जिल्हा तस्करी विरोधी समितीला बळीचे पुनर्वसन ठरवणे आणि पुनर्वसनाबद्दल न्यायालयाला शिफारस देणे आणि पुनर्वसन आराखडा तयार करणे असे अनेक अतिरिक्त अधिकार दिले आहेत.  परंतु प्रस्तावित विधेयकात त्यांना जबाबदार ठरवण्याची कोणतीच यंत्रणा स्थापन केलेली नाही. ज्या व्यक्तींना जिल्हा तस्करी विरोधी समितीने सुचवलेल्या पुर्नवसन प्रक्रियेतून बाहेर पडायचे आहे त्यांना दाद मागण्याच्या प्रक्रियेचा काही उल्लेख नाही. सुटका, पुनर्वसनाचे काम करणाऱ्या संस्थांना हक्कांच्या उल्लंघनासाठी जबाबदार धरले पाहिजे आणि नागरी आणि फौजदारी कायद्यांतर्गत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

## 9. विशेष गृह आणि संरक्षण गृहांसाठी परवाने

विशेष गृह आणि संरक्षण गृह याच्या कामगिरीचे नियमित कालावधी नंतर मुल्यांकन झाले पाहिजे. सुटका केलेल्या व्यक्तींनी अत्यातार, त्रास,किंवा सक्तीने कैद केल्याची तक्रार केल्यास अशा आधारगृहांची परवाना आणि नोंदणी रद्द केली जावी असा प्रस्तावित विधेयकात स्पष्ट उल्लेख असावा. अत्याचाराच्या तक्रारी नोंदवल्या आहेत अशा आधारगृह चालकांविरुद्ध फौजदारी कारवाई केली पाहिजे.

## 10. अनेक स्तरीय यंत्रणा

या कायद्यात अनेक स्तरीय यंत्रणेचे सुतोवाच केले आहे परंतु प्रत्यक्षात या पद्धतीमुळे खालील प्रश्न उद्भवू शकतात.:

a. सध्या अस्तित्वात असलेल्या पोलीस यंत्रणेचा सहभाग आणि भूमिका याबद्दल स्पष्टता नाही.
b. त्याच अधिकाऱ्यांवर अनेक कामे सोपवली जातील त्यामुळे हि व्यवस्था अनुत्पादक होण्याची शक्यता आहे.
c. यंत्रणेतील प्रत्येक घटकासाठी निधी कुठून येणार हे निश्चित केलेले नाही.
d. वर उल्लेख केलेल्या अधिकाऱ्यांची नेमणूक कधीपर्यंत केली जाईल याचा कालावधी निश्चित केलेला नाही.
e. सोशल वर्कर्सच्या निवडीचे निकष, आणि या यंत्रणेत सहभागी होणाऱ्या कल्याणकारी संस्था कोणत्या असतील हे निश्चित केलेले नाही त्यामुळे हितसंबंधी, नैतिक रक्षणकर्ते, आक्रमक लोकांना मोकळे रान मिळेल.